नि.दि.दावा क्र. २४३/२०१३
मधुकर वि ज्ञानदेव
निशाणी क्र. १२१

**सरतपास प्रतिवादी क्र. ३ ते ५ तर्फे विधीज्ञ एस.आर.काळे यांचे तर्फे–**

आता मला माझे शपथपत्र दाखवण्यात आले. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे.

**उलटतपास प्रतिवादी क्र. ७ व ८ तर्फे विधीज्ञ एन.एस.माढेकर यांचे तर्फे–**

हे म्हणणे खरे आहे की, भोत्रा येथील सर्वे नं. ९०/१ हा माझे वाडवडीलार्जित आहे. त्यामध्ये एकुण पाच हिस्सेदार आहेत. त्यामध्ये दोन हिस्सेदारांना ०२हे.१० आर आहे व तीन हिस्सेदारांना ०२ हे. ११ आर आहे. सर्वे नं ९०/१ मधील पुर्वेकडील ०२ हे. १० आर क्षेत्र वादी मधुकरचे आहे व त्याला लागुन पश्चिमेकडील ०२हे. १० आर क्षेत्र रामराव सखाराम गोफणे यांचे आहे. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र. ७ व ८ यांचे वडीलांनी ते क्षेत्र रामराव सखाराम गोफणे यांचेकडुन खरेदी केले आहे. त्याचे सर्वे नं. ९०/१/ड आहे. सर्वे ९०/१/ड च्या पश्चिमेला विठ्ठल गोफणे यांचे ०२हे.११ आर क्षेत्र आहे, दक्षीणेला सीना नदी आहे, उत्तरेला भगवान नारायण गोफणे यांची जमीन आहे. मधुकर गोफणे व रामराव गोफणे यांचे जमीनी दरम्यान पांदण नव्हते. दक्षिणोत्तर बांध होता. हे म्हणणे खरे आहे की, वादी मधुकरने पश्चिमेकडील बांध कोरुन प्रतिवादी क्र. ७ व ८ यांचे क्षेत्रामध्ये १५ ते २० गुंठयामध्ये अतिक्रमण केले आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्यामुळे प्रतिवादी क्र. ७ व ८ यांनी आमचे भावकीतील जमीन असल्यामुळे आमचेविरुध्द तसेच वादी मधुकर यांचेविरुध्द दावा दाखल केला आहे. आम्ही सर्व सर्वे नं.९०/१ ची मोजणी करुन घेणेस तयार आहोत.

**उलटतपास वादी तर्फे विधीज्ञ आय. डी. शेख यांचे तर्फे–**

माझे शिक्षण दहावीपर्यंत झाले आहे. मी मारुती गोफणे यांना पाहिलेले नाही. मी येदु गोफणे वादी क्र. २ चे वडील यांना पाहिलेले आहे. येदु गोफणे अंदाजे १०

वर्षांपुर्वी वारलेले आहे. मी निश्चीत तारीख सांगु शकत नाही.

माझा सर्वे नं.९०/१ असा आहे. त्याचे चतुःसीमा पुर्वेस–मधुकर गोफणे यांची जमीन, पश्चिमेस–श्यामराव देवराव गोफणे यांची जमीन, साक्षीदार आता सांगतो की, माझ्या जमीनीच्या पुर्वेस भिमराव बाबुराव यांची जमीन आहे, श्यामराव देवराव गोफणे मयत आहेत, त्यांची जमीन त्यांची मुले बाबुराव व नितीन गोफणे यांचे ताबयात आहेत. माझ्या जमीनीच्या दक्षिणेस नदी आहे व उत्तरेस – भगवान नारायण गोफणे यांची जमीन आहे. भगवान नारायण गोफणे हयात आहेत.

भगवान नारायण गोफणे यांचे वडिलांचे नाव नारायण गोफणे आहे, नारायण गोफणे यांचे वडीलांचे नाव माधवराव आहे. सखाराम व माधवराव गोफणे हे सख्खे भाऊ आहेत. सर्वे नं.९० मध्ये माधवराव यांचा हिस्सा किती आहे हे मला सांगता येणार नाही. भगवान चा किती हिस्सा आहे हे मला सांगता येणार नाही. मी सर्वे नं.९० चा ७/१२ पाहिला आहे. सर्वे नं.९० मध्ये सखारामला २६ एकर ०३ गुंठे आहेत. माधव व भगवान ला किती क्षेत्र आहेत ते मला सांगता येणार नाही. सर्वे नं. ९० चे एकुण किती क्षेत्र आहे हे मला सांगता येणार नाही. मला माहिती नाही की, सर्वे नं.९० चे क्षेत्र ४६ एकर आहे. हे म्हणणे खरे नाही की, सखाराम व माधव यांचेमध्ये हलक्या भारी वाटण्या झालेल्या होत्या. हे म्हणणे खरे आहे की, २६ एकर जमीन सखारामला दिला व २० एकर जमीन माधव ला दिला. हे म्हणणे खरे नाही की, हलक्या भारी वाटण्या झाल्यामुळे सखारामला २६ एकर व माधव ला २० एकर जमीन दिली.

सखाराम माझे आजोबांचे वडील आहेत. सखाराम ला सर्वे नंबर ९०सोडुन आणखी चार ठिकाणी जमीन आहेत. त्यांचे क्षेत्र व सर्वे नंबर मला सांगता येत नाही. हे म्हणणे खरे आहे की, सर्वे नं.४७,४८, ६०/ए व मढई नं.२ अशा जमीनी आहेत. सर्वे नं. ४७ व ४८ मध्ये प्रत्येकी २६ एकर क्षेत्र आहे. मला माहिती नाही की, सर्वे

नं.६० मध्ये ०५ एकर ११ गुंठे जमीन आहे. मढई नं.२ मध्ये प्रत्येकाला एकुण पाच जणांना प्रत्येकी ३१ गुंठे जमीन आहे. हे म्हणणे खरे आहे की, सर्वे नं.९०,४७,४८, ६०/ए व मढई नं.२ या प्रत्येक ठिकाणी मला जमीन आहे. मधुकर, मारुती व यदा ला या प्रत्येक ठिकाणी आमच्या पेक्षा जास्त जमीनी आहेत. हे म्हणणे खरे आहे की, प्रत्येकाला मारुती, देवराव, विठ्ठल, सुर्यभान व रामराव यांना सारखी जमीन आहे. असे घडले नाही की, दुस–या ठिकाणी मधुकर आणि यदाला कमी जमीन दिली. माझे वडील वसंत यांचे वडील विठ्ठल आहेत. प्रत्येकाला सारखे हिस्से असल्याबाबत मी महसुल अभिलेख दाखल करु शकतो.

सर्वे नं.९० चे सर्वात पश्चिम बाजुला ज्ञानदेव सुर्यभान गोफणे यांची जमीन आहे. त्यांचे पुर्वेला आण्णासाहेब नारायण गोफणे यांची जमीन आहे. त्यांचे पुर्वेला श्रीपतराव गोफणे यांची जमीन आहे. साक्षीदार आता सांगतो की, सर्वे नं.९० च्या एकदम पश्चिमेस ज्ञानदेव सुर्यभान गोफणे आहेत. त्यांचे पुर्वेला श्यामराव गोफणे, त्यांचे पुर्वेला वसंत गोफणे, त्यांचे पुर्वेला भिमराव बाबुराव जगताप, त्यांचे पुर्वेला वादी मधुकर यांचे शेत आहे. प्रतिवादी क्र. ७ व ८ यांनी रामराव गोफणे यांची जमीन खरेदी केली. हे म्हणणे खरे नाही की, रामराव गोफणे व वादी मधुकर गोफणे यांच्या जमीनीच्या दरम्यान पुर्वीपासुन उत्तरदक्षिण पाणंद आहे. हे म्हणणे खरे नाही की, आमचीव आमच्या नातेवाईकाची जमीन असल्यामुळे आमही त्या पाणंदीची नोंद सरकारी नोंद घेतलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, आमचे जमीनीच्या पश्चिमेस श्यामराव व पुर्वेस रामराव यांना जमीनी होती. हे म्हणणे खरे आहे की, सगळया भावांच्या वाटण्या उत्तर दक्षिण नदीपर्यंत आहे व सगळयांच्या उत्तरेस भगवान नारायण गोफणे यांची जमीन आहे. हे म्हणणे खरे नाही की, सगळयांच्या हिस्सेचे दरम्यान पुर्वीपासुन उत्तर दक्षिण बांध आहेत. आमची वाटणी व भिमराव जगताप यांच्या शेताच्या दरम्यान उत्तर दक्षिण बांध नाहीत. पश्चिमेकडील श्यामराव गोफणे व

नि.दि.दावा क्र. २४३/२०१३
मधुकर वि ज्ञानदेव
निशाणी क्र. १२१

आमच्या शेताच्या दरम्यान उत्तर दक्षिण बांध नाही. हे म्हणणे खरे नाही की, पाच ही वाटण्यामध्ये उत्तरेकडुन दक्षिणेकडे पाच ते सहा फुट लांबीचा बांध आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझे जमीनीच्या कोणत्याही बाजुला वादी मधुकर व मोहन यांची वाटणी नाही. हे म्हणणे खरे आहे की, वादी मधुकर व मोहन यांची जमीनीला माझी जमीन लागुन नसल्यामुळे त्यांचे जमीनीला माझा प्रत्यक्ष संबंध येत नाही.

हे मला सांगता येत नाही की, सखारामच्या मुलांनी वाटण्या ८०–९० वर्षांपुर्वी केल्या किंवा कसे. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या जन्मापुर्वी काय घडले हे मला सांगता येत नाही. माझ्या जन्मानंतर चे मला पाहिले नाही. हे म्हणणे खरे आहे की, वाद जमीनीचे रेकॉर्ड मी पाहिलेले नाही. वादी व प्रतिवादींच्या जमीनीमध्ये ऊस आहे. वाटण्या दक्षिणोत्तर ५०० फुट लांब आहेत. सार्वंच्या वाटण्यांच्या उत्तरेला भगवान गोफणे यांची जमीन आहे व त्यानंतर सडकच आहेत. आम्ही सर्व आमचा ऊस भगवान गोफणे यांचे शेतातुन सडकेवर काढतो. प्रत्येक जण आपापल्या शेतातुन नदीवर जातो. हे म्हणणे खरे नाही की, सीना नदीपासुन ते सडकेपर्यंत सर्वांसाठी मधुकर गोफणे व रामराव गोफणे यांचे शेतातुन व पुढे भगवान गोफणे यांचे शेतातुन पाणंद रस्ता आहे.

**न्यायालयाची वेळ संपल्यास्तव पुढील उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब**

श्रवणोत्तर स्वीकृत,

Digitally signed by DILIP GANGADHAR JAGTAP
Date: 2026.07.21 17:28:30 +0530

( दिलीप गं. जगताप )

दिनांक–२१.०७.२०२६

सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, परंडा